विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर (स्वायत्त)

# विवेक

## २०२२ – २३




INTERNATIONAL YEAR OF
MILLETS
2023

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

NAAC Reaccredited with 'A' Grade (CGPA-3.24)
College with Potential for Excellence by UGC

G20 भारत 2023 INDIA

कोल्हापूर (स्वायत्त)

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ।।
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

NAAC Reaccredited 'A' Grade with CGPA 3.24
STAR College by DBT, Govt. of India

# विवेक

५७ वा
वार्षिक अंक
२०२२-२३

।। कला ।। क्रीडा ।। भाषा ।। साहित्य ।। संस्कृती ।।


**प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार**
अध्यक्ष

**डॉ. आरिफ शौकत महात**
संपादक

कोल्हापूर (स्वायत्त)

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वार्षिक नियतकालिक स्पर्धेत सातत्याने क्रमवारीत स्वत:चा अभिजातपणा ठसविलेले सर्जनशील वार्षिक नियतकालिक.




- **मुखपृष्ठ संकल्पना :**

  सौरभ चौगुले
  बी.व्होक.भाग-३

---

- **छायाचित्रण व अंतर्गत रचना विभाग :**

  डॉ. स्वप्नील बुचडे
  प्रा. संतोष कुंडले
  प्रा. राहुल इंगवले
  प्रा. रवी सुतार
  प्रा. सतिश उपळावीकर
  प्रा. राजश्री पाटील
  डॉ. विशाल वाघमारे

---

- **अहवाल विभाग :**

  डॉ. टेकचंद गौपाले

---

- **मुद्रक :**

  श्री. मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर.
  ९८९०१७७०७७

# विवेक

## संपादक मंडळ

अध्यक्ष :
**प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार**

संपादक :
**डॉ. आरिफ शौकत महात**

**विभागीय संपादक :** वरिष्ठ महाविद्यालय

| | |
|---|---|
| मराठी विभाग | डॉ. प्रदीप पाटील |
| हिंदी विभाग | डॉ. दीपक तुपे |
| इंग्रजी विभाग | डॉ. कविता तिवडे |
| विज्ञान विभाग | डॉ. टेकचंद गौपाले |
| उर्दू विभाग | प्रा. एच. एस. नदाफ |

**विभागीय संपादक :** कनिष्ठ महाविद्यालय

| | |
|---|---|
| मराठी विभाग | प्रा. अशोक पाटील |
| हिंदी विभाग | प्रा. बी. के. गावीत |
| इंग्रजी विभाग | प्रा. सुनील जगताप |
| कन्नड/संस्कृत विभाग | प्रा. सौ.उज्वला हिरकुडे |

**संपादन सहाय्य :**

प्रो. डॉ. एकनाथ आळवेकर
प्रा. किरण पाटील
डॉ. स्वप्नील बुचडे
डॉ. सौ. नीता पाटील (ग्रंथपाल)
श्री. हितेंद्र साळुंखे (सहाय्यक ग्रंथपाल)

**कार्यालयीन सहाय्य :**

श्री. सी. बी. दोडमणी (प्रबंधक)
श्री. आर. बी. जोग
श्री. बी. आर. करपे
श्री. एस. एच. दुर्गुळे
श्री. रवी चौगुले (सेवकवर्ग प्रतिनिधी)



# संपादकीय

कोल्हापूर (स्वायत्त)

**नमस्कार,**

**आम्हां घरी धन, शब्दांचीच रत्ने।**
**शब्दांचीच शस्त्रे, यत्ने करू।।**
**शब्दची आमुच्या जीवीचे जीवन।**
**शब्दे वाटू धन, जनलोका ।।**

वरील अभंगात श्री संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे परमेश्वराने माणसाला विचार करण्याची क्षमता दिली आणि त्याचबरोबर अभिव्यक्त होण्यासाठी शब्दशक्ती बहाल केली. या शब्दांचे महत्त्व अपार आहे. विद्यार्थ्यांच्या शब्दांच्या कलागुणाने सजलेला हा सृजनात्मक आविष्कार 'विवेक' वार्षिक नियतकालिक आपल्या हाती सुपुर्द करताना मला खूप आनंद होत आहे.

विवेक हा वार्षिक अंक विद्यार्थी लेखक व कलावंतांच्या आविष्काराचे प्रांगण आहे. आजचा तरुण विद्यार्थी लेखक आणि कलावंत उद्याच्या भारताचा भाष्यकार आहे. वर्तमान जीवन जगत असताना येणारे अनुभव आणि त्याचे प्रामाणिक लेखन करताना भविष्याच्या संदर्भात आशावाद तसेच आजच्या समस्यावर मांडणी करताना त्यांच्यात अस्वस्थता दिसून येते. याबरोबरच या तरुण लेखकाच्या लेखनातून विवेकशीलता, मानवतावाद, विश्वबंधुत्व, राष्ट्रप्रेम इत्यादी भावनांचे प्रतिबिंब दिसते. 'विवेक'च्या प्रत्येक पाना–पानातून तरुण मनाचे सर्जनशील प्रतिबिंब स्पष्ट दिसते. कथा, कविता, ललित लेख, प्रवासवर्णन लेख, आठवणीपर लेख, आत्मकथनात्मक लेख इत्यादी लेखन प्रकारांतून बेरोजगारी, बालमजूरी, स्त्री समस्या यासारख्या वैश्विक विषयांवर विद्यार्थ्यांचे लेखन चिंतन करण्यास भाग पाडते.

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार' हे ब्रीद घेऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. बापूजींच्या या ज्ञानयज्ञामध्ये संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे त्यांच्या पाठीशी सावलीसारख्या ठाम उभ्या होत्या. डॉ. बापूजींच्या विचारांच्या जडणघडणीत महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा व विविध धर्मातील मानवतावादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. या विचारांच्या व बापूजींनी उभ्या केलेल्या तत्वज्ञानाच्या आधारावर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कार्यरत आहे. बापूजींच्या या शैक्षणिक कार्याचा वसा आणि वारसा घेऊन आज संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मा. सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे मॅडम, सी. ई. ओ. श्री. कौस्तुभ गावडे हे सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आहेत.

कोल्हापूर येथील विवेकानंद हे स्वायत्त महाविद्यालय शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा, कला व साहित्य क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन करीत आहे. या महाविद्यालयास २०१८-१९ पासून स्वायत्त (Autonomous ) महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त असून NACC बंगलोर यांचेकडून - ग्रेड (CGPA 3.24) नामांकन आणि स्टार कॉलेज DBT चा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (UCG) नवी दिल्ली यांनी महाविद्यालयाचा CPE या स्कीममध्ये समावेश केला आहे. या महाविद्यालयास आय.एस.ओ. (ISO 9001-2015) नामांकन मिळाले आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी IAS, IPS, DYSP, Deputy Collector व सैन्यदलातील उच्चपदावर कार्यरत आहेत.

या महाविद्यालयात ज्युनियर व सिनियर विभागातील मिळून सुमारे ८००० विद्यार्थी आज शिक्षणाचा लाभ घेत आहेत. यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. व्होक., बी. बी. ए., बी. सी. एस., बी. सी. ए., एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., एम. बी. ए., एम. व्होक. इत्यादी ज्ञानशाखांत शिक्षण घेत आहेत. तसेच महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र कार्यरत असून त्याद्वारे मुख्य शिक्षणप्रवाहापासून वंचित असलेले अनेक विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

महाविद्यालयाने आजतागायत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविले आहेत. यावर्षीही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अनेक खेळाडूंनी सहभाग घेऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मानाची इंटरझोनल, खो-खो खेळातील जनरल चॅम्पियनशिप तसेच कुमारी रिया पाटील हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर साउथ कोरिया येथे आयोजित अंडर ट्वेंटी ॲथलेटिक कॉम्पिटिशन ४ x ४०० रिले स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाने सतत दैदिप्यमान यश संपादन करून महाविद्यालयास लौकिक प्राप्त करून दिला आहे. या बरोबर एन. एस. एस आणि एन. सी. सी. विभागातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कार्य करून विवेकानंद महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातला आहे.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने आपली यशाची परंपरा कायम ठेवत यावर्षीही शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव २०२२-२३ मधे सांघिक कलाप्रकारातील अभिजितदादा कदम जनरल चॅम्पियनशिप, वैयक्तिक कलाप्रकारातील माजी कुलगुरु स्वर्गीय आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक, सरदार बाबासाहेब माने लोककला नृत्य जनरल चॅम्पियनशिप, विलिंग्डन कॉलेज, सांगली शताब्दी मेमोरियल नाट्य विभाग, संगीत विभाग, नृत्य विभाग जनरल चॅम्पियन घेऊन विवेकानंद महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांच्याकडून प्रस्तुत चफी एकांकिकेने यावर्षी महाराष्ट्राच्या मानाच्या विविध स्पर्धेत उज्ज्वल यश संपादन केले आहे.

या अंकाच्या निर्मिती व संपादनाचे काम करताना अनेकांचे प्रोत्साहन व पाठबळ लाभले. यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून सर्वच बाबतीत बहुमोल सहकार्य दिले आहे. संपादक मंडळातील सर्व सहकाऱ्यांनी हा अंक दर्जेदार, माहितीपूर्ण करणेसाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच विद्यार्थ्यांनीदेखील साहित्य लेखणीबरोबर फोटोग्राफी, व्यंगचित्रे, रेखाचित्रे इत्यादी कलाप्रकारात नाविण्यपूर्णता दाखविली आहे.

महाविद्यालयाच्या कामकाजाची विशेष माहिती मिळवून देण्यासाठी रजिस्टार व इतर कार्यालयीन कर्मचारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. अंकाचे काम सुबक, दर्जेदार होण्यासाठी मुरारी मुद्रणालयाचे श्री. तेजस पडवळे, अंकाचे काम करणारे 'सृजन ग्राफिक'चे श्री. सुनील सुतार यांचेही सहकार्य लाभले.

या अंकासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व विद्यार्थी, गुरुदेव कार्यकर्ते यांचे आभार व्यक्त करतो व सर्वांनाच मनापासून धन्यवाद देतो.



**डॉ. आरिफ शौकत महात**
संपादक



# राजं,
# तुम्ही परत या...

खूर्चीवर बसलेल्या भ्रष्टाचारी नेत्याचा,
गरिबांचं शोषण करणाऱ्याचा,
सरकारी कामात खोट करणाऱ्यांचा
वध करायला
राजं, तुम्ही परत या.
स्वराज्याचे सुस्वराज्य करायला,
तिमिरातून तेजाकडे न्यायला,
गल्लोगल्ली मावळे निर्माण करायला,
माणसां माणसांत माणुसकी रुजवायला,
राजं, तुम्ही परत या.
प्रत्येक स्त्रीला मान द्यायला,
तिचा आदर करायला,
तिच्यावर होणारे अत्याचार थांबवायला,
तिला आरक्षण द्यायला,
राजं, तुम्ही परत या.
गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष,
यातील भेदभाव नष्ट करायला,
काळे धंदे बंद करायला,
सर्व कुकर्म थांबवायला,
राजं, तुम्ही परत या.

साक्षी कोळी
बी. एस्सी. भाग २



# पाहताच त्याला


त्याला पाहताच पडले मी प्रेमात त्याच्या,
रोज त्याच्या अदाकारीने घायाळ करायचा तो मला.
रोज नजरेला नजर भिडायची तरी खरी,
पण नजरेतील संवाद नव्हता कधी झाला,
माहीत होते त्यालाही पाहते मी रोज त्याला,
मी पाहण्यासाठी तो ताटकळायचा त्या वाटेला.
आज वाट पाहून थकले त्याची
एक झलक पाहण्यासाठी
पण तो काही तिथे दिसला नाही
वेळ जमली नसावी कदाचित
वाट त्यानेही पाहिली असावी.
दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी जावे
आणि या नजरेची नजर त्याच्यावर पडावी
आता या नजरेचा दोष की मनाचा माहिती नाही,
पण पाहताच त्याला खूश होतात दोघेही.


साक्षी बागेवाडी
बी. ए. भाग २



# राम कृष्ण हरी

कोण म्हणतो विठ्ठल, कोण म्हणतो पंढरी,
कोण म्हणतो पांडुरंग, कोण म्हणतो हरी.
युगे युगे उभा आहेस रे विटेवरी,
सावळे ते रूप हात तुझे कटेवरी.
मागण्यास आलो रे देवा! आज तुझ्या दारी,
नाही म्हणू नकोस, ऐक ना रे माझं एवढंतरी,
आहे ना रे मी तुझा लाडका वारकरी.
मग बनव मज विट, अन् थांब माझ्यावरी,
बनव मज गरूड, अन् कर माझी स्वारी.
बनव मज तुळशीमाळ, कर परिधान तुझ्यावरी,
नको मज अजून काय, कर माझी इच्छा पुरी.
शक्य नसेल हे सर्व, मग भेट ना रे एकदा तरी,
येतोय मी तुला भेटाया, करून पंढरीची वारी.
पाहून तुझे रूप, आनंद होईल मन अंतरी,
दुमदुमु लागेल रे तुझ्या नावाने पंढरी,
असेल एकच जयघोष, जय जय राम कृष्ण हरी.






ऋषी चंद्रकांत डोंगरे
बी. एससी. भाग-२




# राजे फक्त लढ म्हणा

आई जिजावू तुम्ही जर जन्माला आल्या नसत्या
तर अंगणामध्ये दिसली नसती तुळस
जर शिवरायांना तुम्ही जन्माला घातला नसता तर
मंदिरावर राहिला नसता कळस
म्हणूनच म्हणतो राजे फक्त लढ म्हणा.
अपुरे पडतील पाने लिहिता लिहिता तुमचा महिमा
राजे तुम्ही न होता तर आमचा महाराष्ट्र नव्हता
काय सांगावे तुमचे, काय ऐकावे तुमचे,
काय द्यावयाचे तुमचे, आहेत अपुरे शब्दच सगळे
म्हणूनच म्हणतो राजे फक्त लढ म्हणा.
जेव्हा होती रात्र तेव्हा आठवते ती माय
तेव्हा मायेचा पडला तो हात तेव्हा होता अंधार भरपूर
असे गेले किती तरी दिवस
गेला सारा क्षण, अजून होता अंधार तो महाराष्ट्रात,
कोणी नव्हता दूर कराया अंधार तो
म्हणूनच म्हणतो राजे तुम्ही या आमच्या मनामध्ये
आणि फक्त लढ म्हणा.
शेवटी शब्दच अपुरे पडले
लिहिता-लिहिता मीच थकलो,
म्हणूनच म्हणतो,
राजे फक्त लढ म्हणा.



समर्थ कांबळे
बी. ए. भाग ३

गावची चावडी असेल किंवा शहरातील पार्कस असतील, संध्याकाळच्यावेळी वयोवृद्ध लोकं तिथं बसलेली दिसतात. राजकारण असो किंवा एखादा वेगळा विषय असो, ते त्यावर चर्चा करत असतात. त्यांच्याकडे माहितीची आणि अनुभवाची इतकी मोठी शिदोरी असते की, रोजच्या जीवनातील आपल्या काही अडचणींविषयी त्यांना सांगितले तरी ते योग्य तोडगा सांगतात. परंतु आपण त्यांच्याकडे बोलायलाच जात नाही. आपण जर थोडा वेळ जरी त्यांच्याशी संवाद साधला तरी आपल्या ज्ञानात तर भर पडतेच परंतु त्यांच्या चेहऱ्यावर आपल्याशी बोलताना जे समाधान असतं ते आपल्याला एक वेगळाच आनंद देऊन जातं.

सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच बस स्टँड असेल किंवा बसमध्ये असेल, आपण कितीतरी वेळ अनोळखी व्यक्तींसोबत असतो. बसमधून, रेल्वेमधुन प्रवास करत असताना आपल्याला अनोळखी व्यक्तींना जाणून घेण्याची संधी मिळत असते. काही वेळेला तर ते आपल्याच गावचे, आपल्याच नात्यातले निघतात. परंतु आता आपण फक्त मोबाईलमध्येच अडकून पडलोय. आपल्या शेजारी कोण बसलंय याचंही आपल्याला भान नसतं. त्यांच्याशी बोलणं तर लांबच आपण त्यांच्याकडे पाहतही नाही. खरंतर ज्ञानाचा खूप मोठा खजिना वयोवृद्ध व्यक्तींकडे असतो. त्यांना तो आपल्याजवळ रिताही करायचा असतो परंतु आपणच ते प्राशन न करता, स्वतःमध्येच गुंतून अशी सुवर्णसंधी गमावत आहोत.

आधी मैदानी खेळांमुळे मुलं एकत्र यायची, त्यांच्यात संवाद घडून यायचा पण आता संवाद होतो तो फक्त आणि फक्त मोबाईलवरूनच. परंतु याला आपण संवाद नाही म्हणू शकत. आज मित्र मित्राशी स्पर्धा करतो. ''एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' हा मूलमंत्रच कुठेतरी हरवलाय. माणसातला माणूसच आज हरवलाय. त्याला जपणं गरजेचं आहे आणि ते शक्य आहे केवळ आणि केवळ संवादामुळेच.




# NSS कॅम्प

*लाभले मला भाग्य,*
*म्हणून NSS कॅम्पमध्ये आले,*
*पहिल्या दिवशी खूप कंटाळले,*
*मात्र शेवटच्या दिवशी खूप रडले.*
*पहिल्या दिवशी अनोळखी असलेले,*
*एक वेगळच नातं तयार करून गेले,*
*त्याच मैत्रीच्या नात्यात गुंतले*
*आणि दररोजच्या दिनचर्येत मी मनापासून गुंगले.*
*सात दिवस सात क्षणासारखे गेले,*
*फुलपाखरासारखं मनमोहक करून गेले,*
*जीवनातील अभिनय शिकवून गेले,*
*माणुसकीचं बिज मनात रुजवून गेले.*
*कुठे लागले तर सांभाळले,*
*कुठे चुकले तर ओरडले,*
*सर्वांना चांगले रस्ते दाखवले,*
*नशिबवान आहे मी,*
*जे तुमच्यासारखे गुरुवर्य मार्गदर्शक मिळाले.*
*अशा या NSS कॅम्पमध्ये आम्ही आहोत समान,*
*म्हणूनच आम्हाला म्हणतात,*
*विवेकानंद कॉलेजची शान.*



साक्षी कोळी
बी. एस्सी. भाग २



संयोगिता पाटिल
बी. एस्सी. भाग दो (भौतिकशास्त्र)



# यादगार भी और आनंददायी भी...

बहुत सुना था केरल के बारे में। अरब सागर और पश्चिम घाटी के बीच स्थित है केरल। केरल किनारे की लंबाई ५८० किमी। १४ जिलों का यह प्रदेश; जहाँ ४४ नदियाँ बहती हैं। ऊँचे-ऊँचे पहाड़, ऊँची-ऊँची घाटियाँ, बहती झील, वादियों और गहरी ढलानों के बीच में बसा यह केरल। जहाँ धान की खेती और नारियल के पेड़ों की खेती होती हैं। केरल भारत का सबसे ज्यादा साक्षर राज्य। ओमण केरल में मनाया जाने वाला सबसे बड़ा त्योहार। वहाँ के लोगों को 'केरलियन' कहा जाता है और वे मल्यालम भाषा बोलते हैं। भारत यह पहला राज्य है जहाँ का लोकतंत्र कम्युनिस्ट पार्टी के लोगों द्वारा चुना गया है। को दुनिया के शीर्ष १० स्वर्ग में केरल को 'नेशनल ज्योग्राफिक' नामांकित किया गया है। यही सारा सुनहरा माहौल देखना हमारा तय हुआ। हमारे विवेकानंद महाविद्यालय की ओर से आयोजित यात्रा को जाने का दिन भी तय हुआ। उस दिन नहा-धोकर तैंयार हुए। ट्रेन का सफर था। यात्रा के दिन सभी छात्र कोल्हापुर रेलवे स्टेशन पर दो घंटे पहले की मौंजूद रहे। मैं पहली बार ट्रेन में बैंठने जा रही थी। इसलिए थोड़ा-सा तनाव था, मगर ट्रेन शुरू होते ही दूर हो गया।

मिरज रेलवे स्टेशन के वेटिंग रूम में कुछ घंटे इंतजार करना पड़ा। नियत समय से हमारी ट्रेन आधा घंटा देरी से आई। इसलिए हम थोड़े-से ऊब गए। आखिरकार हमारी यात्रा आरंभ हुई। सुबह ५.१० बजे हम एर्नाकुलम स्टेशन पहुँचे। अब सफर बस का था। थोड़ी देर बाद बस मुन्नार के लिए रवाना हुई। रास्ते में कई झरने, दर्शनीय स्थल थे जहाँ नजारा बहुत ही खूबसूरत था, जो देखकर चकित रह गए। केरल के कई दर्शनीय स्थानों को देखकर दिल खुश हो गया। हर पल की यात्रा दिल में कैंद हो गई। प्रकृति की गोद में बहते झरने के पास हमने कई तस्वीरें खींच ली। मुन्नार पहुँचकर कुछ देर आराम किया। नहा-धोकर खाना खाया और मुन्नार देखने निकले। पहले एलिफंट झोन में हाथियों के झुंड देखकर होश उड़ गए। चाय की खूबसूरत बगान देखकर मन हुआ कि हमेशा के लिए वहीं रह जाए। हरा-भरा इलाका, ऊँचे-ऊँचे पेड़, लताएँ लुभावनी थी, एक अलिशान होटल में हमारे रूकने का प्रबंध किया गया।

दूसरे दिन हमने कुमल और मुन्नार में चाय के बगान देखे। दूर-दूर तक मुन्नार और कुमली में फैले चाय के बगान हमने बहुत करीब से देखे; जिससे हम सभी मोहित हो गए। इस बीच हमने नौका विहार का आनंद उठाया। नौका विहार करते हुए हमें सुंदर पक्षी देखने को मिले और देखने मिला जहाँ तक नजर जाती है वहाँ तक पानी ही पानी। आते समय हम नर्सरी में गए जहाँ कई औषधी पेड़-पौंधे थे; जिसकी जानकारी हमें वहाँ मिली।

तीसरे दिन कोचिन में चाय पाउडर कैसे बनती है? देखने के लिए जाने का प्लान बनाया। यह जगह बहुत ऊंचाई पर थी। सुबह वहाँ जाकर चाय पाउडर बनने की प्रक्रिया देखी।

वहाँ कुछ व्यायाम किया। रात का खाना होने के बाद हम कोचीन में नौका विहार करने गए। यहाँ कई प्रकार की नावें दिखाई दी। दोपहर समुद्र में पहुँचे। उफनती लहरों को देखकर बहुत खुशी हुई। हमने समुद्र में खेलने का लुफ्त उठाया।

शिक्षा मंत्रालय के अनुसार केरल में सबसे अधिक साक्षरता यानी ९४ फीसदी है, उसके बाद लक्षद्विप ९१.८५ फीसदी और मिजोरम में ९१.३३ फीसदी है। यह सुनकर बहुत अच्छा लगा कि वहाँ के डाइवर्स भी बहुत अच्छी अंग्रेजी बोलते हैं। उस दिन हम वहाँ देखने गए-चाय पाउडर कैसे बनता है? वह जगह इतनी ऊँचे स्थान पर थी। सुबह थी तो हम सबको घूमना अच्छा लगा। हमें रास्ते में बहुत पसीना आ रहा था, लेकिन इस वजह से कोमल किरणें हमारे शरीर पर आ रही थी। आधा घंटा लगा ऊपर जाने में। वहाँ का नजरा बहुत सुंदर और मनमोहक था। ऐसा लगा जैसे आसमान जमीन को छू रहा हो... सब चीजें हरी चाद्दर में लिपटी है...पक्षियों की चहचहाट और हल्की बरसात हो रही थी।

खूबसूरज नजारे से नजरें हटाकर हम फैक्ट्री के अंदर जाकर देखना चाहते थे - चाय पाउडर कैसे बनती है...? वहाँ हमने चाय पाउडर बनाने की मशीन देखी। पहले वहाँ के मजदूरों ने हमें सबकुछ जानकारी दे दी। उन्होंने बगान की चाय की पत्तियों से लेकर चाय पाउडर बनाने की संक्षिप्त प्रक्रिया से अवगत कराया। उस फैक्ट्री से सभी छात्रों ने चाय पाउडर खरीद लिया, जिसमें सारी सामग्री सही और असली थी। चॉकलेट भी बहुत स्वादिष्ट थे जो कुछ छात्रों ने खरीद लिए।

अगर आप कभी यात्रा के लिए केरल जाएं तो अरनमुला कन्नडी (दर्पण), सुगंधित तेल और सार, केले के चिप्स, नारियल और कॉयर उत्पाद, हस्तशिल्प, आभूषण, कसावु मुंडू, साड़ी और ड्रेस, कथकली मास्क, केरल टी-शर्ट, नेट्टुर, कास्केट (पुराना मेकअप बॉक्स), नीला विलक्क, स्नेक बोट/हाउसबोट मॉडल, मसाले, चाय और कॉफी, मंदिर की पेंटिंग, उरू मॉडल, लकड़ी की मूर्तियाँ आदि चीजें खरीदना ना भूलें।

चौथे दिन की सुबह हम सबके जीवन का यादगार दिन रहा क्योंकि उस दिन हम सब सूर्योदय देखने जा रहे थे और वह भी त्रिवेंद्रम में। तड़के चार बजे उठकर निकल पड़े सूर्योदय देखने के लिए। भारी बारिश हो रही थी। मेरी पसंदीदा पलों में से उस दिन की सुबह में कभी नहीं भूलँगी। वहाँ स्वामी विवेकानंद के गुरु रामकृष्ण परमहंस की विशाल प्रतिमा थी। जहाँ तक नजर जाती वहाँ तक पानी ही पानी था। फिर हम नाश्ता करने चले गए। नाश्ते में इडली और डोसा था; जो बहुत ही स्वादिस्ट था। इडली बहुत फूली हुई थी। नाश्ते के बाद हमने विवेकानंद स्मारक और त्रिवेणी संगम देखा। त्रिवेणी संगम का अर्थ है तीन समुद्रों का संगम। ये तीन समुद्र हैं-हिंद महासागर, प्रशांत महासागर और बंगाल की खाड़ी। यह सारा दृश्य मनोहारी था। उसके बाद हम सब कन्याकुमारी मंदिर देखने गए।

पांचवें दिन सुबह हम सभी उठें, चाय पी ली, नाश्ता किया और सभी लड़के और लड़कियाँ लूँगी पहनकर पद्मनाथ स्वामी मंदिर गए। बाद में नेशनल पार्क देखने गए। यह पार्क बहुत बड़े क्षेत्र में स्थित है। यहाँ हमें तरह-तरह के बंदर, छोटे तोते, बड़े बत्तख, उल्लू, हंस, घड़ियाल, कछुए, हिरणों के झुंड, लाल रंग की मछली, बड़े गेंडे, जेबरा, मोर, चीता, सफेद बाघ आदि को बहुत करीब से देखने का मौका मिला। बाद में राजा रवि वर्मा आर्ट गैलरी देखने गए। राजा रवि वर्मा की बहुत ही सुंदर मनमोहक पेंटिंग देखी। बाद में एशिया में प्रसिद्ध कोवलम बीच देखा। वहाँ समुद्र की लहरों को देखकर मैंने सोचा कि हमारे जीवन में दोस्ती की लहरे भी समुद्र की लहरों की तरह होती है; जो अच्छे को समायोजित करती है और बूरे को दूर करती है।

छठे दिन उठे। सुबह ९.५५ बजे नाश्ता किया और नेत्रावती एक्सप्रेस से हमारी वापसी की यात्रा आरंभ हुई। यात्रा के दौरान दस-बारह विदेशियों से मुलाकात हुई। उनके साथ तस्वीरें खींची। उनसे बात करके अच्छा लगा। सातवें दिन सुबह दस बजे रत्नागिरि पहुँचे और वहाँ से पावस के लिए निकले; जहाँ मंदिर में दर्शन कर रात आठ बजे कोल्हापुर पहुँचे। यात्रा के दौरान हम हिंदी और अंग्रेजी बोलने के इतने आदी हो गए कि मराठी शब्द नहीं बोल पाते थे। पता नहीं चला कि ये सारे दिन कैसे तितली की तरह उड़ गए। मैंने अपने जीवन के यादगार पलों में से एक पल केरल-कन्याकुमारी यात्रा का पल अपने दिल में सहजकर रखा है, जो आज भी ताजगी एवं उमंग का एहसास देता है। केरल में कई नदियाँ है, छोटे-बड़े झरने हैं, दूर-दूर तक चाय की बगान, हरी-भरी पहाड़ियाँ, सुंदर-सुंदर पत्तियाँ, फूल है और नीला आसमान है, प्रकृति का सुनहरा माहौल है तो हर प्रकृतिप्रेमी को केरल-कन्याकुमारी का दौरा अवश्य करना चाहिए।




## विवेक २०२२-२३


### दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट - नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे निवेदन


- प्रकाशन स्थळ : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
- प्रकाशन काळ : वार्षिक
- प्रकाशकाचे नाव : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३, मो. : ९८२२६६४०८२

- संपादकाचे नाव : डॉ. आरिफ शौकत महात
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३ मो. ९८६०८५७०८९
- मुद्रक : श्री. प्रदीप शंकरराव पडवळे
- पत्ता : श्री मुरारी मुद्रणालय, वाय.पी.पोवार नगर, कोल्हापूर. मो. ९८९०१७७०७७

- संगणक/अक्षर रचना : श्री. सुनील धोंडीराम सुतार
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : सृजन डिझाईन, निवृत्ती चौक, कोल्हापूर कोल्हापूर. मो. ७२७६०३६६६४
- स्वामित्व : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

मी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य आहे. या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनाची निवड, संपादन व मुद्रित शोधन विभागीय संपादकांनी केलेले आहे. (खाजगी वितरणासाठी)




लोकराजा
राजर्षी छत्रपती शाहू महाराज

